मराठी भाषा संवर्धनासाठी दैनंदिन जीवनात प्राधान्याने मराठीचाच वापर करावा–अतिरिक्त आयुक्त श्री. सुनिल पवार

नवी मुंबई, दि. २९ (वार्ताहर) : पुस्तक वाचनामुळे जग कळते आणि आपल्या विचारांना दिशा मिळते तसेच योग्य मार्गाने चालण्याची ऊर्जा मिळते, त्यामुळे आपण पुस्तके वाचत राहिली पाहिजेत असे सांगत अतिरिक्त आयुक्त श्री.सुनिल पवार यांनी मोबाईल वाचन संस्कृतीतून बाहेर पडून आपण पुस्तक वाचन संस्कृतीकडे वळायला पाहिजे अशा शब्दात वाचनाचे महत्व अधोरेखीत केले.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचे औचित्य साधून विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्यामधील अधिकारी, कर्मचारीवृंदांच्या अंगभूत प्रतिभेला वाव देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या स्वकविताावाचन, चरित्र-आत्मचरित्र अभिवाचन आणि वक्तृत्व स्पर्धा अशा 3 स्पर्धांच्या पारितोषिक वितरण सोहळ्याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त श्री. सुनिल पवार यांनी उपस्थितांशी दिलखुलास संवाद साधला.

मराठी भाषेची जाण आणि जाणीव मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यापुरती मर्यादीत न ठेवता आपल्या दैनंदिन जीवनात आपल्या मायबोली मराठीचाच प्राधान्याने वापर करायला हवा हे त्यांनी उदाहरणे देत

निग्रहपूर्वक सांगितले. जोपर्यंत चंद्र – सूर्य आहेत तोपर्यंत मराठी भाषा राहील, मात्र ती सर्वोत्त्म स्थानी असावी यासाठी आपण तिचा जास्तीत जास्त वापर करायला हवा असे मत व्यक्त केले.

मराठी भाषा संवर्धन पंधरवडा कालावधीतच उत्तम लिखाणातून मराठी भाषेच्या विकासासाठी अथक कार्यरत असणारे नवी मुंबईचे नागरिक जगप्रसिध्द सुलेखनकार श्री. अच्युत पालव यांना राष्ट्रीय स्तरावरील मानाचा पद्मश्री पुरस्कार जाहीर होणे ही आपल्या सर्वांसाठी अतिशय अभिमानाची आणि आनंदाची गोष्ट असल्याचेही ते म्हणाले. याप्रसंगी परिमंडळ २ उपआयुक्त डॉ. कैलास गायकवाड, महापालिका सचिव श्रीम. चित्रा बाविस्कर, भांडार विभाग उपआयुक्त श्री. शंकर खाडे उपस्थित होते. मान्यवरांच्या शुभहस्ते तिन्ही स्पर्धेतील विजेत्यांना प्रथम, व्दितीय, तृतीय व पाच उत्तेजनार्थ अशी प्रत्येकी आठ पारितोषिके प्रदान करण्यात आली. विशेष म्हणजे पारितोषिके ही त्या त्या स्पर्धेला साजेशी ग्रंथ स्वरुपात देण्यात आली.

डोंबिवलीत तीन गांजा तस्करांना अटक

डोंबिवली, दि. २९ (वार्ताहर) : गेल्या दोन दिवसात विशेष अंमली पदार्थ विरोधी पथकाने डोंबिवलीत विविध भागांमध्ये धडक कारवाई केली. या कारवाईत तीन गांजा तस्करांना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून तब्बल ३० किलो गांजा जप्त करण्यात आला आहे.

कल्याण परिमंडळाचे पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांच्या नेतृत्वाखाली डोंबिवली आणि कल्याण शहरांना नशामुक्त करण्यासाठी विशेष मोहीम हाती घेण्यात आली. विशेष अंमली पदार्थ विरोधी पथकाचे पोलीस उपनिरीक्षक पंढरीनाथ चव्हाण व त्यांच्या पथक डोंबिवली पूर्वेकडील आयरे गाव, लक्ष्मण रेषा इमारत परिसरात गस्त घालत असताना रेल्वे मार्गाजवळ एका इसमाचा संशय आला.पोलिसांना आपला संशय आल्याचे लक्षात येताच त्याने पळवण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी त्यांचा पाठलाग पकडले. पोलिसांनी किरण शहा (४०, रा. तुकारामनगर, डोंबिवली पूर्व) जवळून आठ किलो गांजा जप्त करण्यात आला. त्याची किंमत दीड लाख रुपये असून, किरण शहा याच्यावर मध्यप्रदेशमध्ये गांजा तस्करीचे गुन्हे दाखल झाला आहे.

दुसऱ्या कारवाईत, ठाकुर्लीतील चोळेगाव भागात गस्त घालत असताना, चोळेगाव तलावाजवळ दोन इसम संशयास्पदरीत्या फिरताना आढळले. पोलिसांनी त्यांना अडवून चौकशी केली असता, सचिन मोरे (२१) आणि संजु लुहार (२४) या दोघांकडे २३ किलो गांजा आढळला, ज्याची किंमत ४.५७ लाख रुपये आहे. हे दोघेही मध्यप्रदेशातील रहिवासी असल्याचे उघड झाले आहे. पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली कल्याण-डोंबिवलीत अंमली पदार्थ विरोधी मोहिम तीव्र करण्यात आली आहे. पोलिसांना असे आढळले आहे की मध्यप्रदेशातून गांजा तस्करी करून डोंबिवलीत काही लोक या पदार्थांची मागणी करत आहेत. त्यामुळे या मागणी मागील मुख्य सूत्रधार कोण आहेत, तसेच किरकोळ विक्रेते कोण आहेत, याचा शोध पोलीस घेत आहेत.

जाहीर सूचना

तमाम जनतेला याद्वारे सूचना देण्यात येत आहे की माझे अशिल श्रीमती इरफाना बानो मोहम्मद अक्रम शाह आणि श्री मुहम्मद अक्रम अब्दुल जब्बार शाहफकीर यांनी १०/१२/२०२४ रोजीच्या अनुक्रमांक. टीएनएन -१२-१७९८३/२०२४ अन्वये उप प्रबंधक ठाणे शहर यांच्या कार्यालयात नोंदणीकृत करारान्वये १०/१२/२०२४ रोजीस सौ. तहसीन अब्दुलकादर कुरेशी आणि श्री. मुश्ताक अहमद अब्दुलकादर कुरेशी यांच्याकडून सदर खरेदी केले होते. मिळकत तपशील हा ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीत, गाव ठाणे, तालुका व जिल्हा ठाणेच्या जुम्मा मशिदीच्या मागे, डॉ अन्सारी रोड, १ एआ राबोडी, ठाणे(पश्चिम) ४००६०१ मोजमापीत ५२० चौ फूट चटई क्षेत्र येथे स्थित **''काझी सीएचएस लि.''**अशा ज्ञात इमारतीमध्ये, ४थ्या मजल्यावर फ्लॅट क्र. ४०२ आहे.

सदर मिळकतही श्री अब्दुल कादर मोईनुद्दीन कुरेशी यांच्या नावे होती आणि ते सन १९८० मध्ये''काझी सीएचएस लि.'' चे मूळ सदस्य होते आणि सोसायटीने श्री अब्दुल कादर मोईनुद्दीन कुरेशी यांना जुन्या इमारतीत फ्लॅट क्र १४ वाटपपत्रा मार्फत वाटप केला होता ज्याच्या आधारे श्री अब्दुल कादर मोईनुद्दीन कुरेशी यांच्याकडे १७/०३/१९८१ रोजी सोसायटीने जारी केलेल्या शेअर प्रमाणपत्र क्र. १५ मधील विभिन्न क्रमांक ७१ ते ७५ धारक प्रत्येकी रु.५०/- चे ५ शेअर्स चे धारक होते.

श्री अब्दुल कादर मोईनुद्दीन कुरेशी यांचे १७/०३/२००९ रोजी निधन झाले असून त्यांच्या पश्च्यात सौ. तहसीन अब्दुलकादर कुरेशी (मुलगी) आणि श्री. मुश्ताक अहमद अब्दुलकादर कुरेशी (मुलगा) हे त्यांचे जून्या फ्लॅट क्र १४ करिता कायदेशीर वारस व प्रतिनिधी हक्कदार आहेत.

सदर सोसायटीने सदर जमीन व सदर इमारतीचा पुनर्विकास करण्याचा निर्णय घेतला व सदर सोसायटीच्या सर्वसाधारण मंडळ सभेत सदर जमीन व सदर जुन्या इमारतीचा पुनर्विकास मे. एलिट एंटरप्रायझेस द्वारे काझी सीएचएस लिमिटेड आणि मे.एलिट एंटरप्रायझेस यांच्यात निष्पादित १५/११/२०१८ रोजी विकास करारान्वये करण्याचा ठराव करण्यात आला.

मे. एलिट एंटरप्रायझेस (विकासक) आणि तहसीन अब्दुलकादर कुरेशी व श्री. मुश्ताक अहमद अब्दुलकादर कुरेशी (वाटपी) यांच्यातनिष्पादित ११/०६/२०१५ रोजीचा नवीन फ्लॅटच्या वाटपाकरिता करारान्वये त्यात नमूद केलेल्या अटी व शर्तीवर जुन्या फ्लॅटच्या बदल्यात ती मिळकत संपादित केली. सदर कराराची नोंदणी ११/०६/२०१५ रोजीच्या नोंदणी क्र. टीएनएन१-५५९८-२०१५ धारक लॉजमेंट पावती ५९४३ अन्वये हमीचे उप प्रबंधकाच्या कार्यालयात करण्यात आली होती.

जर कोणालाही सदर दस्तावेज सापडल्यास किंवा कोणीही व्यक्ती ज्यांना सदर वरील संदर्भित मिळकतीवर किंवा त्याच्या काही भागावर विक्री, देवाणघेवाण, गहाण, प्रभार, भेटवस्तू, देखभाल, वारसा, ताबा, भाडेपट्टा, कुळवहीवाट, उप-कुळवहीवाट धारणाधिकार, परवाना, जंगमगहाण, कोणत्याही विश्वस्त अंतर्गत नामाधिकार किंवा लाभार्थी हितसंबंध हस्तांतरित करणे, कोणतेही भेट विलेख, मृत्युपत्र, गहाण किंवा वरील मिळकतीच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचा दावा नामाधिकार दावा असल्यास, कृपया ही सूचना प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून ७ दिवसांच्या आत आक्षेप नोंदवा. लेखी आक्षेप नोंदविण्यासाठी, पत्ता खालीलप्रमाणे.

(वकील आदित्य एच. गाडे)
उच्च न्यायालय, मुंबई
ए.जी. असोसिएट्स,
४०१, गजानन कमर्शियल कॉम्प्लेक्स
ग्लोबल बिझनेस सेंटर वर,
सिडको बस स्टॉप जवळ, ठाणे पश्चिम – ४०० ६०१

मेसर्स टेक्सोरेंज कॉर्पोरेशन लिमिटेड (अवसायनात) यांच्या इ लिलाव विक्रीची सूचना

अवसायक यांचा पत्ता : डी २, २ रा मजला, डी विंग, चाणक्य सीएचएस लिमिटेड, महावीर नगर, कांदिवली (पश्चिम), मुंबई शहर, महाराष्ट्र ४०० ०६७
इ मेल : riteshadatiya०१@gmail.com | liquidation.texorange@gmail.com

याद्वारे आम जनतेला इंसॉल्व्हंसी अँड बँकरपसी अधिनियम २०१६ कलम ३५ (एफ) आर डब्ल्यू आयबीबीआय (अवसायन प्रक्रिया) अधिनियम २०१६ चा नियम ३३ च्या अनुसार मालमत्तांच्या **"जसे आहे जिथे आहे", "जे आहे ते आहे", "जे आहे जसे आहे"** आणि **"विदाउट रिकोर्स"** तत्वावर विक्रीसाठी सूचना देण्यात येत आहे.

लिलावाची तारीख आणि वेळ	सोमवार, दिनांक ०३/०३/२०२५ संध्याकाळी ३. ०० ते ०५. ०० च्या दरम्यान
स्वारस्याची अभिव्यक्ती सादर करण्याची शेवटची तारीख आणि वेळ	गुरुवार दिनांक १३/०२/२०२५ रोजी संध्याकाळी ०५. ०० पूर्वी
पात्र बोलीदार यांना माहिती देण्याची तारीख	गुरुवार दिनांक २०/०२/२०२५
ईएमडी सादर करण्याची अंतिम तारीख	शुक्रवार, दिनांक २८/०२/२०२५ रोजी संध्याकाळी ५. ०० पूर्वी आरटीजीएस / डीडी यांच्या माध्यमातून **"टेक्सोरेंज कॉर्पोरेशन लिमिटेड अवसायनात"** यांचा खाते क्रमांक ७००८०२००००३०४४ आणि आयएफएससी BARBOSAMMUM येथे भरणा करणे आवश्यक आहे.
पाहणीची तारीख	गुरुवार दिनांक २०/०२/२०२५ ते गुरुवार दिनांक २७/०२/२०२५, पूर्व परवानगीने संपर्क व्यक्ती श्री राजेश आदित्य (मोबाः + ९१ ९९७९८ ५५२६६)

लॉट क्रमांक	विक्रीसाठी ठेवण्यात आलेल्या मालमत्तेचा तपशील	राखीव किंमत (रु)	ईएमडी (रु)	बोली वाढविण्याची रक्कम (रु)
१	इंडस्ट्रिअल फॅक्टरी शेड, प्लॉट क्रमांक ४९, गट क्रमांक ४२३, मालेगाव इंडस्ट्रीज को ऑप इस्टेट लिमिटेड मालेगाव, जिल्हा नाशिक, कीर्ती टाईल्स फॅक्टरीच्या समोर, गायत्री करेन सर्व्हिसेसच्या नजीक, हॉटेल अंबिका नजीक, मुंबई आग्रा राष्ट्रीय महामार्गाच्या समोर, चाळीसगाव फाटा, मौजे सायाने बीके, तालुका मालेगाव, जिल्हा नाशिक ४२३ २०३ क्षेत्र ११८५ चौरस मीटर्स बिल्ट अप क्षेत्र ७२२. ६१ चौरस मीटर्स	८१,४५,४३०	८,१४,५४३	१,००,०००
२	इंडस्ट्रिअल फॅक्टरी शेड, प्लॉट क्रमांक ७१, गट क्रमांक ४२३, मालेगाव इंडस्ट्रीज को ऑप इस्टेट लिमिटेड मालेगाव, जिल्हा नाशिक, कीर्ती टाईल्स फॅक्टरीच्या समोर, गायत्री करेन सर्व्हिसेसच्या नजीक, हॉटेल अंबिका नजीक, मुंबई आग्रा राष्ट्रीय महामार्गाच्या समोर, चाळीसगाव फाटा, मौजे सायाने बीके, तालुका मालेगाव, जिल्हा नाशिक ४२३ २०३, क्षेत्र ९१० चौरस मीटर्स बिल्ट अप क्षेत्र ७१०. ७० चौरस मीटर्स	६९,६०,७६६	६,९६,०७६	१,००,०००
३. (एकत्रित लॉट १ आणि २)	इंडस्ट्रिअल फॅक्टरी शेड, प्लॉट क्रमांक ४९, गट क्रमांक ४२३, मालेगाव इंडस्ट्रीज को ऑप इस्टेट लिमिटेड मालेगाव, जिल्हा नाशिक, कीर्ती टाईल्स फॅक्टरीच्या समोर, गायत्री करेन सर्व्हिसेसच्या नजीक, हॉटेल अंबिका नजीक, मुंबई आग्रा राष्ट्रीय महामार्गाच्या समोर, चाळीसगाव फाटा, मौजे सायाने बीके, तालुका मालेगाव, जिल्हा नाशिक ४२३ २०३ क्षेत्र ११८५ चौरस मीटर्स बिल्ट अप क्षेत्र ७२२. ६१ चौरस मीटर्स आणि इंडस्ट्रिअल फॅक्टरी शेड, प्लॉट क्रमांक ७१, गट क्रमांक ४२३, मालेगाव इंडस्ट्रीज को ऑप इस्टेट लिमिटेड मालेगाव, जिल्हा नाशिक, कीर्ती टाईल्स फॅक्टरीच्या समोर, गायत्री करेन सर्व्हिसेसच्या नजीक, हॉटेल अंबिका नजीक, मुंबई आग्रा राष्ट्रीय महामार्गाच्या समोर, चाळीसगाव फाटा, मौजे सायाने बीके, तालुका मालेगाव, जिल्हा नाशिक ४२३ २०३, क्षेत्र ९१० चौरस मीटर्स बिल्ट अप क्षेत्र ७१०. ७० चौरस मीटर्स	१,५१,०६,१९६	१५,१०,६१९	१,००,०००

ही विक्री सूचना निविदा प्रपत्राला जोड समजावी ज्यात इ लिलावाच्या सविस्तर अटी आणि शर्ती नमूद करण्यात आल्या आहेत आणि ते प्रपत्र liquidation.texorange@gmail.com येथे इ मेलच्या माध्यमातून संपर्क साधल्यास उपलब्ध होऊ शकेल.
कोणत्याही शंका असल्यास श्री तुषार पारीख (मोबा : ७९९०८२२३५१) येथे किंवा इ मेलच्या माध्यमातून info@indiaevoting.com किंवा अवसायक यांचा इ मेल तपशील liquidation.texorange@gmail.com येथे संपर्क साधावा.

दिनांक : ३०/०१/२०२५
स्थळ : अहमदाबाद
रितेश प्रकाश आदित्य
टेक्सोरेंज कॉर्पोरेशन लिमिटेड (अवसायनात) यांचे अवसायक
आयपी नोंदणी क्रमांक : आयबीबीआय / आयपीए - ००१/ आयपी - पी०१३३४/ २०१८- २०१९/ १२०१३
एएफएची वैधता : ३१/१२/२०२५

ओसीस्प्रे कन्सलटन्ट्स लिमिटेड

नेविले हाउस, जे. एन. हेरेदिया मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई – ४०० ००१
दूर. : ०२२-६६६२०००० वेबसाइट : www.oseaspre.com ईमेल : oseaspre@gmail.com
सीआयएन : L74140MH1982PLC027652
दि. ३१ डिसेंबर, २०२४ रोजी संपलेल्या तिमाही व नउ महिने अखेरकरिता
अलेखापरीक्षित वित्तीय अहवालाचा निष्कर्ष (रु. लाखात)

अनु. क्र.	विवरण	तिमाही अखेर ३१.१२.२०२४ (अलेखापरीक्षित)	तिमाही अखेर ३१.१२.२०२३ (अलेखापरीक्षित)	नउ महिने अखेर ३१.१२.२०२४ (अलेखापरीक्षित)
१.	कार्यचलनामधून एकूण उत्पन्न (निव्वळ)	०.९५	१.२४	३.२५
२.	कालावधीकरिता (कर पूर्व, अतिविशेष व/वा अतिरिक्त बाबीपूर्व) निव्वळ नफा/तोटा	(३.८३)	(३.२०)	(१०.२७)
३.	करपूर्व कालावधीकरिता निव्वळ नफा/ तोटा (अतिविशेष व/वा अतिरिक्त बाबीपश्चात)	(३.८३)	(३.२०)	(१०.२७)
४.	करपश्चात कालावधीकरिता निव्वळ नफा/तोटा	(३.८३)	(३.२०)	(१०.२७)
५.	अन्य सर्वसमावेशक उत्पन्न (कराचे निव्वळ)			
	१. बाबी ज्या नफा वा तोटा मध्ये मोडतात	-	-	-
	२. बाबी ज्या नफा वा तोटा मध्ये नाही मोडत	-	-	-
	३. बाबीच्या संबंधात आयकर जे नफा वा तोटा करिता मोडत नाही	-	-	-
	अन्य सर्वसमावेशक उत्पन्न (ओसीआय)	-	-	-
६.	कालावधीकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न	(३.८३)	(३.२०)	(१०.२७)
७.	प्रदानित इक्विटी शेअर भांडवल (दर्शनी मूल्य प्रति शेअर १० प्रत्येकी)	२०.००	२०.००	२०.००
८.	अन्य इक्विटी	-	-	-
९.	उत्पन्न प्रति शेअर (रु. १० प्रत्येकी) (वार्षिक नाही)			
	ए) मूळ रु.	(१.९२)	(१.६०)	(५.१४)
	बी) सौम्य रु.	(१.९२)	(१.६०)	(५.१४)

टिप:
१. वरील हे सेबी (एलओडीआर) विनियमन २०१५ च्या विनियम ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेजेससह दि. ३१ डिसेंबर, २०२४ रोजी संपलेल्या तिमाही व नउ महिने अखेरकरिता विस्तृत प्रारूपांचे सारांश आहे. वित्तीय अहवालाचा संपूर्ण प्रारूप स्टॉक एक्सचेज वेबसाइट www.bseindia.com वर उपलब्ध आहे व कंपनीची वेबसाइट www.oseaspre.com वर उपलब्ध आहे.
२. वरील अहवाल लेखा समिती द्वारे पाहण्यात आला आहे व संचालक मंडळ यांच्याद्वारे मंजूर केला आहे व त्यांचे संबंधित सभा बुधवार दि. २९ जानेवारी, २०२५ रोजी आयोजित केली आहे.

ओसीस्प्रे कन्सलटन्ट्स लिमिटेडकरिता
सही/-
ठिकाण : मुंबई **जे. सी. भाम (अध्यक्ष)**
दि. २९ जानेवारी, २०२५ **डीआयएन ०२८०६०३८**

महाराष्ट्र शासन
अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांचे प्राधिकरण
पहिला मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
EMAIL ID-addcollmumbai@gmail.com **PH. NO-** (०२२) २२६१००१३

जाहिर नोटीस

श्री. मनोजकुमार सुखदेव कलवार --------- **अपिलार्थी**
विरुध्द
सक्षम प्राधिकारी -१ झो.पू.प्रा व इतर २ --------- **प्रतिवादी**
प्रति,
श्री. रामगरीब संतु कहर
मानुरवाडी एस. आर.ए सहकारी गृहनिर्माण संस्था
वडाळा, मुंबई ४०० ०३७. --------- **(प्रतिवादी क्र. ३)**

सदर जाहिर नोटीसीद्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, अपिलार्थी यांनी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३५ अंतर्गत मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर, पहिला मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग रोड, फोर्ट, मुंबई ४००००१. येथे झोपडीवर पात्रतेकामी अपिल अर्ज दाखल केला आहे. आपणांस सदर अपील प्रकरणी प्रतिवादी केले आहे. प्रकरणी मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांनी आपणांस पुढील सुनावणी तारखेबाबत जाहिर नोटीसीद्वारे अवगत करणेचे निर्देश दिले आहे. सदर प्रकरणी पुढील **सुनावणी दि. ०४.०२.२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता** निश्चित केली आहे.

आपण सदर प्रकरणामध्ये प्रतिवादी केले असून, सदर जाहिर नोटीसीद्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, आपण नियोजित **सुनावणी दि. ०४.०२.२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता** मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांचे दालनात उपस्थित हजर राहून, आपली बाजू मांडावी. उपरोक्त नमूद केलेल्या दिवशी आपण स्वतः अथवा आपले प्राधिकृत प्रतिनिधी उपस्थित न राहिल्यास, आपणास काहीही सांगावयाचे नाही, असे गृहित धरुन प्रकरणी गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल, यांची नोंद घ्यावी.

शिक्का
सही/-
अजितकुमार चंद्रसेन भटे
सहाय्यक महसुल अधिकारी अपर
जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर

महाराष्ट्र शासन
अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांचे प्राधिकरण
पहिला मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
EMAIL ID-addcollmumbai@gmail.com **PH. NO-** (०२२) २२६१००१३

जाहिर नोटीस

श्री. प्रमोद दिनकर उबाळे --------- **अपिलार्थी**
विरुध्द
सक्षम प्राधिकारी -१ झो.पू.प्रा व इतर ८ --------- **प्रतिवादी**
प्रति,
१. हौसाबाई चाबुरराव गोडे --------- **(प्रतिवादी क्र. ३)**
२. जमुना दिपकर उबाळे --------- **(प्रतिवादी क्र. ४)**
३. कुंदा डॅनियल मगर (कुंदा दिनकर उबाळे - माहेरचे नाव) --------- **(प्रतिवादी क्र. ५)**
४. पोर्णिमा दिपक रणदिवे पोर्णिमा दिपक रणदिवे (पोर्णिमा दिनकर उबाळे- माहेरचे नाव) ----- **(प्रतिवादी क्र. ६)**
५. रुपाली सागर दारोळे (रुपाली दिनकर उबाळे - माहेरचे नाव) --------- **(प्रतिवादी क्र. ७)**
६. अमोल दिनकर उबाळे --------- **(प्रतिवादी क्र. ८)**
७. श्रीम. संध्या लूथर मगर (संध्या दिनकर उबाळे माहेरचे नाव)
सर्वांचा पत्ता :- मानुरवाडी एस. आर.ए सहकारी गृहनिर्माण संस्था
वडाळा, मुंबई ४०० ०३७. --------- **(प्रतिवादी क्र. ९)**

सदर जाहिर नोटीसीद्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, अपिलाथर्थी यांनी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३५ अंतर्गत मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर, पहिला मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग रोड, फोर्ट, मुंबई ४००००१, येथे झोपडीवर पात्रतेकामी अपिल अर्ज दाखल केला आहे. आपणांस सदर अपील प्रकरणी प्रतिवादी केले आहे. प्रकरणी मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी. मुंबई शहर यांनी आपणांस पुढील सुनावणी तारखेबाबत जाहिर नोटीसीद्वारे अवगत करणेचे निर्देश दिले आहे. सदर प्रकरणी **पुढील सुनावणी दि. ०४.०२.२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता** निश्चित केली आहे.

आपण सदर प्रकरणामध्ये प्रतिवादी केले असून, सदर जाहिर नोटीसीद्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, आपण नियोजित **सुनावणी दि. ०४.०२.२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता** मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांचे दालनात उपस्थित हजर राहून, आपली बाजू मांडावी. उपरोक्त नमूद केलेल्या दिवशी आपण स्वतः अथवा आपले प्राधिकृत प्रतिनिधी उपस्थित न राहिल्यास, आपणास काहीही सांगावयाचे नाही, असे गृहित धरुन प्रकरणी गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल, यांची नोंद घ्यावी.

शिक्का
सही/-
अजितकुमार चंद्रसेन भटे
सहाय्यक महसुल अधिकारी अपर
जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर

महाराष्ट्र शासन
अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांचे प्राधिकरण
पहिला मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
EMAIL ID-addcollmumbai@gmail.com **PH. NO-** (०२२) २२६१००१३

जाहिर नोटीस

श्री. जोसेफ एंथोनी रॉड्रीक्स --------- **अपिलार्थी**
विरुध्द
सक्षम प्राधिकारी १ झो.पु.प्रा व इतर १ --------- **प्रतिवादी**
प्रति,
अँथोनी कायतान फर्नांडीस.
जनसेवा रहिवाशी सह गृह संस्था, माहिम वस डेपो,
माहिम (प), मुंबई ४०००१६. --------- **(प्रतिवादी क्र. २)**

सदर जाहिर नोटीसीद्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, अपिलार्थी यांनी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३५ अंतर्गत मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर, पहिला मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग रोड, फोर्ट, मुंबई ४००००१, येथे झोपडीवर पात्रतेकामी अपिल अर्ज दाखल केला आहे. आपणांस सदर अपील प्रकरणी प्रतिवादी क्र. ०२ केले आहे. प्रकरणी दि. ०६.०८.२०२४ रोजी मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांनी आपणांस पुढील सुनावणी तारखेबाबत जाहिर नोटीसीद्वारे अवगत करणेचे निर्देश दिले आहे. सदर प्रकरणी पुढील **सुनावणी दि. ०४.०२.२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता** निश्चित केली आहे.

आपण सदर प्रकरणामध्ये प्रतिवादी क्र. ०२ असून, सदर जाहिर नोटीसीद्वारे आपणांस सुचित करण्यात येते की, आपण नियोजित **सुनावणी दि. ०४.०२.२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता** मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांचे दालनात उपस्थित हजर राहून, आपली बाजू मांडावी. उपरोक्त नमूद केलेल्या दिवशी आपण स्वतः अथवा आपले प्राधिकृत प्रतिनिधी उपस्थित न राहिल्यास, आपणास काहीही सांगावयाचे नाही, असे गृहित धरुन प्रकरणी गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल, यांची नोंद घ्यावी.

शिक्का
सही/-
अजितकुमार चंद्रसेन भटे
सहाय्यक महसुल अधिकारी अपर
जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर

जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की माझे अशिल (१) भक्ती भरत जोशी, (२) आरती केतन गुरव, (उर्फ आरती भरत जोशी) आणि (३) स्वरदा स्वप्नील जोशी, (उर्फ पूनम भरत जोशी) हे मयत भरत पुरुषोत्तम जोशी यांचे वारस आणि कायदेशीर प्रतिनिधी आहेत, जे त्यांच्या जीवनकाळात फ्लॅट क्र. १०२/४, पुष्पा स्पर्श सीएचएसएल, लिबर्टी गार्डन रोड क्र.1, लिबर्टी गार्डन पोस्ट ऑफिस जवळ, मालाड (पश्चिम), मुंबई- 400 064 चे चांगले पूरक हक्कदार होते आणि विभिन्न क्र. 16 ते 20 (दोन्ही समावेशी) धारक प्रत्येकी पन्नास रुपयांच्या पाच पूर्ण भरणा शेअर्ससाठी अनु क्र.4 चे शेअर प्रमाणपत्रचे (यापुढे ' सदर फ्लॅट' आणि 'सदर शेअर्स' असा उल्लेख) देखील धारक होते.
27.05.2019 रोजी भरत पुरुषोत्तम जोशी यांच्या निधनानंतर, वरील नावे माझ्या अशिलांनी सदर फ्लॅट आणि त्या शेअर्समध्ये हक्क, नामाधिकार आणि हितसंबंधाचा दावा केला आहे. माझे अशिल, मयत भरत पुरुषोत्तम जोशी यांचे एकमेव कायदेशीर वारस आणि प्रतिनिधी असल्याने कोणालाही वगळून सदर फ्लॅट आणि त्या शेअर्समध्ये समान हक्क, नामाधिकार आणि हितसंबंध मिळण्यास पात्र आहेत.
सदर फ्लॅटमधील मयत व्यक्तीचे हक्क, नामाधिकार आणि हितसंबंध, शेअर्सच्या हस्तांतरणासंदर्भात कोणताही दावा/आक्षेप असल्यास ही सूचना जारी केल्याच्या तारखेपासून १४ दिवसांच्या आत मागवित आहेत आणि ते खालील पत्त्यावर, ईमेल- आयडी आणि फोन क्र. वर निम्नस्वाक्षरीकाराना संपर्क करावा.

परिशिष्ट

फ्लॅट क्र. १०२/४, पुष्पा स्पर्श सीएचएसएल, लिबर्टी गार्डन रोड क्र.1, लिबर्टी गार्डन पोस्ट ऑफिस जवळ, मालाड (पश्चिम), मुंबई- 400 006 आणि विभिन्न क्र. 16 ते 20 (दोन्ही समावेशी) धारक प्रत्येकी पन्नास रुपयांच्या पाच पूर्ण भरणा शेअर्ससाठी अनु क्र.4 चे शेअर प्रमाणपत्र चे धारक.

सही/-
वकील स्वाती पी. गौतम
कार्यालय आणि निवासस्थानः ए-404, फ्लेमिंगो, पन्नालाल घोष मार्ग, मित्तल कॉलेज जवळ, मालाड (प), मुंबई 400 064. (मोबाइल क्र. 9820785814)
ईमेल आयडी
ADVOCATESWATIGAUTAM@GMAIL.COM

जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की माझे अशिल कु.रमा रमेश मेश्राम आणि कु. सरिता रमेश मेश्राम हे फ्लॅट नं. २०१, दुसरा मजला, मोजमापीत क्षेत्र ४३२ चौ. फू. बिल्ट अप क्षेत्र, जलाराम सीएचएस लि., शिंपोली रोड, बँक ऑफ बडोदाच्या वर, बोरिवली (पश्चिम) मुंबई-४०००९२ करिता डॉ. भरत गोपालदास उदेशी यांच्यासह विक्रीकरिताचा कराराकरिता वाटाघाटी करत आहेत.
माझे अशिल पुढे सांगतात की, डॉ भरत गोपालदास उदेशी हे डॉ गोपालदास एस उदेशी यांच्यासह संयुक्त मालक होते. संयुक्त मालक म्हणजेच डॉ गोपालदास एस उदेशी यांचे २१.०३.१९९४ रोजी निधन झाले, त्यानंतर, डॉ. भरत गोपालदास उदेशी यांनी त्यांच्या फ्लॅट परिसराच्या संदर्भात, ३०/१२/२०२४ रोजीच्या नोंद.दस्तावेज क्र.बीआरएल-५-२१४७६-२०२४ अन्वये सोडून दिल्याचा विलेख निष्पादित केला.
माझे अशिल पुढे सांगतात की, आता सदर फ्लॅटची जागा खरेदी करण्यास इच्छुक आहे आणि जर कोणतीही व्यक्ती आणि/किंवा वित्तीय संस्था ज्यांना कोणताही आक्षेप जसे की वारसा, शेअर, गहाण किंवा भार किंवा अन्यकाहीही असल्यास तसे खाली नमूद केलेल्या वकीलांच्या पत्त्यावर ही सूचना प्रकाशित झाल्यापासून १५ दिवसांच्या आत पुरक कागदोपत्री पुराव्यासह त्याचे/तिचे/त्यांचे आक्षेप, दावे लेखी सादर करावे, अशी विनंती केली जा